दि. 21 जानेवारी,2014

# स्थिरता विरुद्ध अस्थिरता

श्री अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

मागच्या आठवड्यात खुप काही शिकण्यासारखे होते. तीन वेगवेगळ्या नेत्यांचा वीजन ऑफ इंडिया चा दृष्टिकोन मी अगदी जवळून पाहिला.

राहूल गांधी यांनी अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी ला संबोधित केले आणि पक्ष कार्यकर्त्यांचे मनोधैर्य उंचावण्याचा प्रयत्न केला. ते दिशाहीन झाल्याचे प्रतीत होते. सद्य स्थितीत पंतप्रधानपदाचा उमेदवार कोण असेल याचा निर्णय घेण्यात न आल्याने हा मनोवैज्ञानिक लाभ त्यांना मिळणार आहे. त्यांचे संबोधन हे आक्रमक होते परंतु अस्पष्ट होते.

नरेंद्र मोदी यांनी आपल्या वाकचातुर्याने भाजपाच्या राष्ट्रीय परिषदेला संबोधित केले. राजकीय परिस्थिती वगळता, त्यांनी भारताविषयी सकारात्मक वक्तव्य केले. त्यांनी चर्चेचा स्तर चांगला केला. त्यांनी आकडयांचा उपयोग करून गोष्टी समजावल्या. त्यांनी आधुनिक आणि मजबुत भारताचा दृष्टिकोण सादर केला. कृषि, शिक्षण आणि आरोग्यासाठी त्यांनी सकारात्मक विचार सादर केले. त्यांनी सांगितले की प्रत्येक राज्यात आयआयटी, आयआयएम आणि AIIMS सारख्या श्रेष्ठ संस्था असणे गरजेचे आहे. भारतातील एकही घर मुलभूत सुविधांशिवाय राहिला नाही पाहिजे असा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. सुवर्ण चतुष्कोण, 100 शहरांना जोडणारे औदयोगिक कॉरिडोर आणि बुलेट ट्रेन भारताचा चेहरा बदलेले असेही ते म्हणाले. गरिब आणि वंचितांसाठी खास कार्यक्रम घेण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. या सर्व बाबी भाजप आणि 2014 मध्ये नरेंद्र मोदी यांच्या प्रचारासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

तिसरी गोष्ट आप पक्षाचे राजकारण पाहायला मिळाले. हा पक्ष परंपरागत राजकारणासमोर प्रतिक्रियांच्या राजकारणामधून उभा राहिला आहे. त्या पक्षाने वैकल्पिक राजकारणाचे वचन दिले होते. तो वैकल्पिक राजकारण राजकारण आता अराजकतेत परिवर्तित होत आहे असे स्पष्ट दिसून येते. आप पक्षाच्या नेत्यांकडून करण्यात आलेली वक्तव्ये विरोधाभासी आहेत. लोकपालासाठी चळवळ करणा-या आप पक्षाचे नेत्यांनी, सीबीआय ही केंद्र सरकारची यंत्रणा असल्याने ती केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली नसावी असा युक्तीवाद केला होता. तीच लोक आता राज्य पोलिस दिल्लीत निवडून आलेल्या प्रतिनिधिंच्या अधिपत्याखाली असावी असे बोलतात. या नेत्यांमध्ये माणुसकीचा अभाव दिसून येतो असे बोलणे खोटे ठरणार नाही. आप पार्टीच्या नेत्यांच्या जाहीर वक्तव्यामध्ये मालविया नगरमध्ये कायद्याचे शासन, राजकीय साहस, मोठी घमंड, माणूसकीचा अभाव आणि संस्थांसाठी कमीत कमी चिंता असे दिसून येत आहे. त्यांनी आंदोलनात भाग घेण्यासाठी पोलिसांना अपील केले. दोन दशकाआधी एका कट्टरतवादी गटाने प्रजासत्ताक दिवसाच्या बहिष्कारासाठी आवाहन केले होते. आज राष्ट्रीय पक्षाच्या कृत्याने प्रजासत्ताक दिनाला गडबडी करण्याचे भय दाखवत आहेत. त्यांचे वर्तन घटनेसाठी एक आव्हान बनले आहे. त्यांचे सदस्य जम्मू-काश्मीरमधील विभाजनकर्ते आणि छत्तीसगड मधील माओवाद्यांचे समर्थन करित आहेत.

मी राज्यसभेत प्रश्न विचारण्यावेळी अराजकतेचे साम्राज्य या शब्दाचा उपयोग केला होता. दिल्लीत रस्त्यांवर प्रदर्शन करून अराजकता आणखी वाढेल. अंधाधुंदी वैकल्पिक राजनिती होऊ शकत नाही.